REGISTERED No. B. 3434

**जाहिरातींचे दर.**
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

**वर्गणीचे दर.**
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ४ आक्टोबर, १९४४ अंक ४०

## दि बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना : १९०६ ]

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... ... रु. | २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | ... ... ... रु. | १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड | ... ... ... रु. | १,२३,००,००० |

**मुख्य कचेरी:** ओरिएण्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

**मुंबईमधील शाखा:** बुलियन एक्सचेंज, कुलाबा, काळबादेवी आणि मलबार हिल.

**इतर शाखा:** अहमदाबाद ( भद्र, मुख्य ऑफिस ), अहमदाबाद ( एलिस ब्रिज शाखा ), अहमदाबाद ( स्टेशन शाखा ), अमृतसर, अंधेरी ( मुंबई शेजारीं ), बांद्रे ( मुंबई शेजारीं ), कलकत्ता ( क्लाइव्ह स्ट्रीट, मुख्य ऑफिस), कलकत्ता (बडा बझार), कलकत्ता (चौरंगी स्क्वेअर), जमशेदपूर कराची, मद्रास, नागपूर ( किंग्जवे ), नागपूर ( इतवारी बझार ), पुणें पुणें शहर, राजकोट, सुरत, भुज,( कच्छ ).

**लंडन एजन्ट्स:** वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

**डायरेक्टर्स:** सर चुनीलाल व्ही. मेहता, के. सी. एस्. आय.(अध्यक्ष); श्री. अंबालाल साराभाई; सर जोसेफ के. नाइट; मि. ए. गेडिस; सर कावसजी जहांगिर, बॅरोनेट, जी. बी. ई., के. सी. आय. ई.; मि. दिनशा के. दाजी; श्री. रामनिवास रामनारायण.

**करंट डिपॉझिट अकाउंट्स :**

दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या शिलकेवर ½% दरानें व्याज दिलें जातें. रु. १,००,००० वरील व्याज खास योजनेनें दिलें जातें. सहामाही अखेर व्याजाची किमान रक्कम ५ रु. पेक्षा कमी झाल्यास व्याज दिलें जात नाहीं. कायम, अल्प मुदतीच्या व सेव्हिंग बँक ठेवी योग्य व्याजानें स्वीकारल्या जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

विल्स व सेटलमेंट्सप्रमाणें बँक एक्झिक्यूटर व ट्रस्टी म्हणून काम करते, सर्व तऱ्हेचें ट्रस्टींचें काम केलें जातें. नियम अर्ज करून मागवावेत.

एजंटः—एच्. ए. करीमभाई

## देना बँक

देवकरण नानजी बँकिंग कं. लिमिटेड

चीं
६ वर्षें आणि ३ वर्षांचें
अनुक्रमें ३॥ टक्के आणि २॥ टक्के व्याज देणारीं

**कॅश सर्टिफिकिटें**

रु. १० पासून रु. ५,००० पर्यंतच्या विभागांत मिळूं शकतात.

स्थानिक तीनहि शाखांचीं सेव्हिंग्ज बँक डिपार्टमेंटस् प्रत्येक रविवारीं सकाळीं उघडीं राहतील.

**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार

**डोक्यांतील उवा १ तासांत मारण्याचा आश्चर्यकारक शोध**

## लायसॉफ

बाटली किंमत १ रु. ट. ख. निराळा
दोन वेळा उपयोग

**दि मागोरा केमिकल कं. लि.**
— हिराबाग, पुणें २ —

गिरगांव मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## "अर्था"चा पुढील अंक

**ता. ११ ऑक्टोबर रोजीं "अर्था"चा अंक निघणार नाहीं. त्या पुढील अंक ता. १८ ऑक्टोबर रोजीं "दिवाळी अंक" म्हणून प्रसिद्ध होईल.**

# विविध माहिती

### गोल्ड कोस्टकडे ब्रिटिशांचें अधिक लक्ष जाणार

आफ्रिकेंतील आपल्या गोल्ड कोस्ट वसाहतीकडे ग्रेटब्रिटन आतां विशेष लक्ष पुरवूं लागला आहे. गोल्ड कोस्ट ही ब्रिटिश वसाहत स्वायत्ताच्या आखातांत आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे व तिचें क्षेत्रफळ अंदाजें ग्रेटब्रिटन एवढेंच आहे. बॉक्साइट (ॲल्युमिनियमचा कच्चा पदार्थ) चा साठा तेथें जेवढा आहे, (२०,००,००,००० टन) तितका जगांत अन्यत्र नाहीं. तेथील मँगेनीजची चालू असलेली खाण सर्व जगांतील खाणींत मोठी आहे. गोल्ड कोस्टमध्यें सोनेंहि सांपडतें. कांहीं महिन्यांपूर्वी तेथील संस्थानिकांना लष्करांत दाखल झालेल्या स्थानिक उमेदवारांना कसें शिक्षण दिलें जातें, हें दाखविण्यांत आलें. ब्रिटिश मंत्री, शास्त्रज्ञ, इत्यादींची गोल्ड कोस्टकडे आतां रीघ लागून राहिली आहे.

### जप्त केलेल्या कापडाच्या विक्रीची व्यवस्था

दुकानांत व गिरण्यांत जप्त केलेलें व सरकारी नियंत्रणाखालील गिरण्यांत तयार होणारें कापड मुंबई शहरांतील सरकारमान्य अशा ९८१ दुकानांत विक्रीस ठेवण्यांत आलें आहे. गिरणीच्या किंमतींत १०% वाढ करून कापड विकलें जातें. ह्या दुकानांकडे गेल्या तीन महिन्यांत ७८½ लक्ष रुपयांचें कापड विक्रीसाठीं देण्यांत आलें. दिवाळीसाठीं आणखी कापड देण्यांत येईल.

### भारत इं. बँकेची बेलापूर शाखा

भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें, च्या बेलापूर रोड शाखेस प्रारंभ बुधवार, ता. २७ रोजीं दसऱ्याचे सुमुहूर्तावर झाला आहे.

### शेतकरी कर्ज निवारण कायदा

मुंबई प्रांताचा शेतकरी कर्ज निवारणाचा कायदा सध्यां १६ तालुक्यांस लागू करण्यांत आलेला आहे. तो ७६ तालुक्यांस लागू करण्यांत यावयाचा आहे. कायद्यांत कांहीं दुरुस्त्या केल्या जातील.

### कॅनडांतून एंजिनें आलीं

कॅनडामधून मागविलेल्या १४५ रेल्वे एंजिनांपैकीं ५२ एंजिनें हिंदुस्थानांत दाखल झालीं आहेत व त्यांतील कांहीं कामासहि लागलीं आहेत.

### पराक्रमी सैनिकांना बक्षिसें

चालू युद्धांत विशेष पराक्रम दाखविणाऱ्या सैनिकांना मुंबई सरकार जमिनीचें उत्पन्न व २ ते १० हजार रुपयांची रोख बक्षिसें देणार आहे. बक्षिसांची रकम रोखीनें न देतां, जमीन खरेदी, मुलांचें शिक्षण, इत्यादींसाठीं रकमेंतून पैसे मिळूं शकतील व रकमेवरचें व्याज मिळेल.

### २० लक्ष महारोगी

ब्रिटिश साम्राज्यांत एकूण २० लक्ष महारोगी आहेत. हा कलंक व तो धुवून काढण्याचे चालू असलेले प्रयत्न ह्याची तपशीलवार माहिती ब्रिटिश एंपायर लेप्रसी रिलिफ असोसिएशनच्या वार्षिक सभेंत नुकतीच देण्यांत आली.

### निदर्शक भेट

ॲबिसिनियाचा बादशहा व महाराणी ह्यांनी ब्रिटिश राजे राणी ह्यांस नुकतीच निदर्शक भेट पाठवून, एबिओपियाला इटालीच्या ममरमिठींतून सोडविल्याबद्दल ब्रिटिश जनतेचे उपकार स्मरले आहेत.

### पाव १४ दिवस ताजा

पाव १४ दिवस ताजा राखण्याची युक्ति नॉर्मंडींत सैन्य उतरवितांना उपयोगांत आणली होती.

### युद्धांतील ब्रिटिश कामगिरीच्या फिल्म्स

चालू युद्धांतील ब्रिटिश कामगिरीची यथार्थ माहिती देणारे चित्रपट ब्रिटिश सरकारनें तयार केले असून युरोपांतील देश जर्मनीच्या तावडींतून मोकळे होतील, त्या अनुक्रमानें त्या देशांकडे हे चित्रपट धाडले जातील.

### म्हैसूरमध्यें इलेक्ट्रिक मोटारींचें उत्पादन

म्हैसूर सरकारच्या कारखान्यांत पांच अश्वशक्तीच्या विजेच्या मोटारी तयार होऊं लागल्या आहेत व त्यांची चाचणी चालू आहे.

### नारळ व खोबरेल ह्यांचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

हिंदुस्थानांत सुमारें १५ लक्ष एकरांत नारळीचीं झाडें असून दरसाल त्यांपासून ३०० कोटि नारळ निघतात. गेल्या महायुद्धापूर्वी हिंदुस्थानांतून खोबरें व खोबरेल ह्यांची निर्गत होत असे, आतां निर्गत जवळ जवळ थांबली असून आयात हळुहळु वाढूं लागली आहे. १९४०–४१ व १९४१–४२ मध्यें दरसाल सरासरीनें हिंदुस्थानांत १ लक्ष टन खोबरें व ५४ हजार टन खोबरेल आयात झालें. नारळांचें उत्पादन वाढविण्यासाठीं एक दश वार्षिक योजना आखावी, असें हिंदुस्थान सरकारच्या मध्यवर्ती ॲग्रिकल्चरल मार्केटिंग खात्याच्या रिपोर्टांत म्हटलें आहे.

### मुंबई प्रांतांतील उसाची लागवड

चालू वर्षी (१ ऑगस्ट अखेरचा अंदाज) मुंबई प्रांतांत एकूण १,५१,००० एकर जमिनींत ऊंस लावण्यांत आलेला आहे. त्यांपैकीं ४९,००० एकर ऊंस संस्थानी हद्दींत आहे.

### हिंदी लोकांचा युद्धखर्चासाठी त्याग

हिंदुस्थान व ग्रेटब्रिटन ह्यांचेमधील युद्धखर्चाच्या वाटणीसंबंधींची व्यवस्था हिंदुस्थानास फार अनुकूल आहे, अशी ब्रिटिश विचारसरणी आहे, तिला उत्तर देतांना "प्लॅनिंग" (पोलिटिकल अँड एकॉनॉमिक प्लॅनिंग गटाचे तर्फे प्रसिद्ध होणारें मासिक) नें काढलेले उद्गार उद्बोधक आहेत. ते मासिक म्हणतें, "हिंदुस्थानाच्या आर्थिक परिस्थितीचे मानानें खर्चाचा बोजा फाजील आहे. हिंदुस्थाननें इंग्लंडला दिलेलें कर्ज हें कांहीं सुखीचें कर्ज नाहीं. युद्धखर्च भयंकर वाढला, त्या मानानें नित्योपयोगी मालाचें उत्पादन वाढलेलें नाहीं व काटकसरहि अंमलांत आलेली नाहीं. मालाचा तुटवडा व फाजील चलन ह्यांचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. हिंदुस्थानाच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा पांचवा हिस्सा लष्करी खर्चाकडे जात आहे. अर्थात्, इंग्लंडमध्यें त्यांचें येणें निर्माण होत आहे. ग्रेट ब्रिटनमधील लोकांच्या उत्पन्नाचा पांच अष्टमांश हिस्सा युद्धकार्याकडे खर्च होत असतो, तरीसुद्धां हिंदी जनतेचा खरा त्याग हा जास्त मोठ्या प्रमाणावरचा आहे. हिंदुस्थानांतील लोकांची संमती घेतली न जातां तो युद्धांत पडला आहे, म्हणून त्याच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्लंडवरच पडते, हा मुद्दा स्वतंत्रच आहे."

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३१४ |
| २ युद्धोत्तर काळांत सोन्याचें स्थान ... ... | ३१५ |
| ३ म. गांधींचा वाढदिवस | ३१६ |
| ४ मुंबई प्रांताचें शेतकी खातें | ३१६ |
| ५ आर. ए. परीक्षेचा निकाल | ३१६ |
| ६ स्फुट विचार ... ... | ३१७ |
| मि. चर्चिल ह्यांचें सिंहावलोकन—स्वराज्याच्या प्रश्नास हिंदुस्थानांत वाव—उसाचें व साखरेचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता. | |
| ७ सहकारी बँकांचे अहवाल | ३१८ |
| ८ चितळेवाडी येथील धान्य व चारा दिन... ... | ३१९ |
| ९ महाड को. अर्बन बँक | ३२० |



# अर्थ

बुधवार, ता. ४ आक्टोबर, १९४४


## युद्धोत्तर काळांत सोन्याचें स्थान

### लॉर्ड केन्स ह्यांचें आश्वासन

एक वेळ मुंबईच्या बाजारांत सोन्याचा भाव विलक्षण भडकला होता आणि अलीकडे तो पुष्कळ उतरला आहे. ह्यापुढें आणि विशेषतः युद्धसमाप्तीनंतर सोन्याची किंमत किती राहील ह्याविषयीं कुतूहल उत्पन्न झालें असल्यास त्यांत नवल नाहीं. अमेरिकेंत भरलेल्या जागतिक चलन परिषदेंत आंतरराष्ट्रीय हुंडणावळ आणि राष्ट्रीय चलनें ह्यांत स्थिरता उत्पन्न करण्याच्या हेतूनें एक जागतिक गंगाजळी निर्माण करण्याचें ठरलें. ह्या गंगाजळींतील सोनें आणि आंतरराष्ट्रीय हुंड्या ह्यांच्या साहाय्यानें राष्ट्रीय चलनांच्या मोलाचे परस्पर संबंध स्थिर राखण्यांत यावयाचे आहेत. निरनिराळ्या राष्ट्रांच्या चलनांच्या किंमती प्रमाणबद्ध रहाव्या एवढ्यासाठी त्यांच्या साखळीचा दुवा सोनें हा निश्चित केलेला आहे. प्रत्येक राष्ट्राच्या चलनास ठराविक सुवर्ण परिमाण आधारभूत राहील आणि ह्या परिमाणास अनुसरून आंतरराष्ट्रीय देणीघेणीं भागवलीं जातील. व्यापारी व्यवहारांच्या गरजेप्रमाणें राष्ट्रीय सरकारनें कागदी चलन कमी-अधिक पुरवलें असतां त्याची किंमत स्थिर राहील आणि सोन्याचा त्यास आधार देण्याची आवश्यकता उरणार नाहीं असें कित्येक लोक प्रतिपादीत असून चलनें आणि सोनें ह्यांचा संबंध तोडून टाकावा असें ते सुचवीत आले आहेत. सोन्याच्या कमी-अधिक पुरवठ्यावरच चलनाचें मोल आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार अवलंबून ठेवणें हें आधुनिक प्रगतीच्या काळांत भूषणावह नाहीं असें त्यांचें म्हणणें आहे आणि सोन्यावरचें आर्थिक देवघेवींचें अवलंबन त्यांस नाहींसें करावयाचें आहे. कांहीं वर्षामागें इंग्लंडमधील सोन्याचें नाणें व्यवहारांत सर्रास खेळत असे आणि कोणासहि कागदी चलनाच्या मोबदल्यांत नाणें सहज मिळत असे. देवघेवींचें काम कागदी नोटांनीं भागत असतां सोन्याच्या नाण्याचा उपयोग करणें उधळेपणाचें आणि निष्कारण अडचणी उत्पन्न करणारें आहे असें प्रत्यक्ष अनुभवास आल्यावरून मध्यवर्ती बँकेवरील नोटांच्या मोबदल्यांत मागणारास सोन्याचें नाणें देण्याची जबाबदारी दूर करण्यांत आली. व्यापाराच्या ओघांत एखाद्या देशास दुसऱ्याचें विशेष देणें झालें आणि त्या योगानें हुंडणावळीचा दर मर्यादेबाहेर जाऊं लागला तर तो स्थिर राखण्यासाठी आवश्यक असलेलें सोनें पुरवण्याचा परिपाठ बँक ऑफ इंग्लंडनें चालू केला. हिंदुस्थानांत हीच चलन—हुंडणावळ पद्धति अंगिकारण्यांत आली आहे. परदेशांचें देणें त्यांवर काढलेल्या हुंड्या पुरवण्यानेंहि भागवतां येतें आणि ह्या व्यवस्थेंत सोन्याचा प्रत्यक्ष उपयोग करावाहि लागत नाहीं. राष्ट्रांच्या चलन व्यवस्थेंत आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या पद्धतींत सोन्यास युद्धापूर्वींहि महत्त्वाचें स्थान ह्याप्रमाणें राहिलें नव्हतें. अशा स्थितींत युद्धोत्तर काळांत पुन्हां सोन्यास चलनाचा आधार ह्या नात्यानें मानाचें स्थान देण्यांत येणार आहे कीं काय असा प्रश्न सहाजिक रीतीनें विचारण्यांत येत आहे. ह्या त्याच्या भावी स्थानावर सोन्याची किंमत अवलंबून रहाणार असल्यानें बाजारामध्यें प्रस्तुत विषयास महत्त्व प्राप्त झालें आहे.

सोन्याचा उपयोग डागडागिन्यांसाठी केला जातो तसाच तो नाणीं व चलनी नोटांचा आधार ह्यांकरितांहि करण्यांत येतो. चलनाच्या मोबदल्याचें सौकर्य व हुंडणावळीची स्थिरता ह्यांच्या सिध्यर्थ कोट्यवधि रुपयांचें सोनें राष्ट्रीय मध्यवर्ती बँकांस व सरकारांस संग्रहीं गंगाजळ्यांत ठेवावें लागतें. ह्या कार्यासाठी सोन्याचा उपयोग होणार नसेल तर त्या धातूचा पुरवठा इतर कामांकरितां वाढेल आणि त्याची किंमत उतरेल. तेव्हां युद्धोत्तर काळांत आंतरराष्ट्रीय चलन व्यवस्था ज्या रीतीनें घडवण्यांत येईल तीवर सोन्याच्या भावी किंमती अवलंबून रहातील हें उघड आहे. ह्या दृष्टीनें अमेरिकेंत भरलेल्या जागतिक चलन परिषदेनें मान्य केलेल्या व्यवस्थेकडे पाहिलें पाहिजे. ह्या परिषदेचे वृत्तांत इंग्लंडला बातमीदारांनीं पाठविले त्यांवरून त्या देशांत असा समज उत्पन्न झाला कीं जुन्या वळणाची सोन्यावर आधारलेली चलन पद्धति स्थापन केली जावी असें ब्रिटिश प्रतिनिधी लॉर्ड केन्स ह्यांनीं प्रतिपादलें. नोटांच्या मोबदल्यांत सोन्याचें नाणें किंवा त्याच्या चिपा देण्याच्या मध्यवर्ती बँकेच्या जबाबदारीवर आधारलेल्या चलन पद्धतीचा कटु अनुभव ब्रिटिश जनतेस आलेला असल्यानें लॉर्ड केन्सनीं तिचा पुरस्कार केलेला पाहून इंग्लंडमध्यें व्यवहारी लोकांस व तज्ञांस आश्चर्याचा धक्का बसला. आपल्या परिषदेंतील भाषणाचा विपर्यास झालेला पाहून लॉर्ड केन्सना वस्तुस्थिति स्पष्ट होण्यासाठी खुलासा करावा लागला. त्यांत त्यांनीं असें म्हटलें आहे कीं चलनाच्या व व्यापारी व्यवहाराच्या राज्यांत सोन्यास अमर्याद सत्ताधारी बनवावें असें आपण कधींच प्रतिपादलें नाहीं. सोन्याचें संपूर्ण उच्चाटन करावें असेंहि त्यांनीं सुचवलें नाहीं. सोन्याची किंमत व चलनांचें मोल ह्यांत प्रमाणबद्धतेचा दुवा असावा असें मत त्यांनीं व्यक्त केलें. नियोजित जागतिक चलन-गंगाजळीच्या सहायानें हा दुवा कार्यक्षम करतां येईल आणि आंतरराष्ट्रीय हुंडणावळीच्या दरांत लवचीकपणा राखतां येईल, असा त्यांचा युक्तिवाद आहे. सुवर्णास पूर्वीप्रमाणें अनियंत्रित स्वामी न बनवतां त्यास व्यवहाराच्या सेवकाची भूमिका बजावायची असा आपला उद्देश असल्याचें लॉर्ड केन्स ह्यांनीं स्पष्ट केलें आहे. आपल्या स्वतःच्या मताचे पुष्ट्यर्थ त्यांनीं शेवटचा मुद्दा पुढें मांडला आहे तो येथें ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ते म्हणतात कीं, अमेरिकेंत हजारो कोटि रुपये किंमतीचें

सोनें साठलें आहे आणि ब्रिटिश साम्राज्यांतील देशांत व रशियांत सोन्याच्या खाणी आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चलनव्यवस्थेंत सोन्यास स्थान असूं नये असें म्हणणें वेडगळपणाचें होईल, कारण अमेरिकेंतील सोन्याचा प्रचंड साठा निर्माल्यवत् करणें आणि ब्रिटिश व रशियन सोन्याच्या खाणी बंद पाडणें असाच त्याचा अर्थ होईल. मित्रराष्ट्रांच्या ह्या सुवर्णविषयक हितसंबंधांचें संरक्षण करण्याचा हेतु भावी जागतिक चलन व्यवस्थेच्या मुळाशीं असल्यानें युद्धोत्तर काळांतील त्या धातूची किंमत ह्या हितसंबंधास अनुसरून निश्चित केली जाईल असें सरळ अनुमान लॉर्ड केन्स ह्यांच्या विचारसरणीवरून निघतें. सध्याच्या त्याच्या जागतिक किंमतीच्या मानानें सोन्याचा भाव विशेष खालीं जाऊं दिला जाणार नाहीं असा स्पष्ट ध्वनी त्यांच्या विधानांतून निघतो. विविध जागतिक चलनें सोन्याच्या तारेनें एकत्र गुंफल्यानें त्यांच्या परस्पर प्रमाणांत स्थैर्य साधणें आणि मित्रराष्ट्रांच्या सोन्यांतील संपत्तीचें रक्षण करणें ह्या त्यांच्या दुहेरी उद्दिष्टामुळें सोन्याचा भाव उचलून धरला जाईल.

### महात्मा गांधींचा पंचाहत्तरावा वाढदिवस

महात्मा गांधींस त्यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसाच्या निमित्तानें त्यांच्या देशबांधवांकडूनच नव्हे तर परदेशांतूनहि दीर्घायुष्य चिंतणारे अभिनंदनपर संदेश आले आहेत. ह्यावरून त्यांच्या अपूर्व ध्येयपूर्ण व्यक्तिमत्वाबद्दल जगामध्यें किती आदर पसरला आहे ह्याची कल्पना येते. हिंदुस्थानांत महात्मा गांधींच्या कांहीं राजकीय, अध्यात्मिक व आर्थिक विचारांचे बाबतींत तीव्र मतभेद असले तरी त्यांनीं अन्याय, विषमता, दारिद्र्य व अज्ञान ह्यांचे विरुद्ध अविश्रांत चालवलेली दुर्दम्य मोहीम परिणामकारक झाली आहे ह्यांत संशय नाहीं. हिंदुस्थानास राजकीय व आर्थिक स्वातंत्र्य मिळावें, देशांतील निरनिराळ्या जातींत व वर्गांत सख्य नांदावें, अस्पृश्य वर्गाची सामाजिक व आर्थिक उन्नति व्हावी, खेडेगांवी लोकांची स्थिति सुधारावी, श्रमजीवी शेतकरी व कामकरी ह्यांची राहाणी चांगली व्हावी, हिंसा व युद्धें ह्यांचें जगांतून उच्चाटन व्हावें व सर्वत्र समता, स्वातंत्र्य व न्याय ह्यांचें साम्राज्य पसरावें ह्या अनेकविध पैलूंचें ध्येय पुढें ठेवून तें साध्य होण्यासाठी बंदिवास सोसूनहि रात्रंदिवस निर्भयपणानें व निरपेक्ष प्रयत्न करण्यांत महात्मा गांधींनीं स्वतःचें सबंध जीवन वेंचलें आहे. त्यांस आम्ही दीर्घायुष्य व आरोग्य चिंतितों आणि त्यांच्या ध्येयस्फुरित, अहिंसात्मक व शांततामय प्रयत्नानें हिंदुस्थानाची सर्वांगीण उन्नति होवो अशी आशा प्रकट करतों. कस्तुरबा निधी महात्माजींचे वाढदिवसाचे निमित्तानें त्यांचे स्वाधीन करण्यांत आला आहे. संकल्पापेक्षांहि अधिक मोठा असा हा निधी अल्पावधींत जमला आहे ह्यावरून त्या साध्वीच्या त्यागमय चरित्राविषयींचा लोकांचा पूज्यभाव व्यक्त होत आहे. ह्या निधीच्या उद्देशाकडे पहातां त्यांत महात्मा गांधींच्या व्यापक व उच्च ध्येयाचें स्पष्ट प्रतिबिंब दिसून येतें ह्यांत संशय नाहीं.

### ग्रेट ब्रिटनचा युद्धखर्च

गेल्या सबंद महायुद्धाचा खर्च ग्रेट ब्रिटनला ८०० कोटि पौंड आला. चालू महायुद्धाचा आतांपर्यंतचा खर्च १९०० कोटि पौंडांवर गेला आहे. चालू युद्धाचे प्रारंभीं जेवढें ग्रेट ब्रिटनचें एकूण राष्ट्रीय कर्ज होतें, त्याच्या १$\frac{1}{2}$ पट रकम कर्जाऊ काढावी लागली. वरील माहिती मि. हर्बर्ट मॉरिसन ह्यांनीं आपल्या भाषणांत सांगितली.

## मुंबई प्रांताचें शेतकी खातें

### कारभार व सांपत्तिक स्थिति.

१९४२ मध्यें, शेतकी खात्याच्या व्यवस्थेंत ज्या मुख्य सुधारणा घडून आल्या आहेत त्या येणेंप्रमाणें: (अ) जमिनीस बांध बांधणें व कोरडवाहू शेतीची पहाणी व सुधारणा करण्यासंबंधीं एकत्र असलेल्या योजनेअन्वयें बांध बांधण्यासंबंधींच्या स्वतंत्र विभागाची स्थापना, (ब) कोंकण विभागाची डिव्हिजनल सुपरिंटेंडेंट ऑफ ॲग्रिकल्चर याच्या हाताखालीं स्वतंत्र शेतकी विभाग म्हणून पुनर्रचना करण्यांत आली. त्याशिवाय, जिल्ह्यांत कपाशी, धान्यें व तंबाखु यांच्या रोपट्यांची लागवड करण्यासंबंधींच्या बहुतेक कामावर टेक्निकल निर्बंध व देखरेख चालविण्यासाठीं क्रॉप बोटॅनिस्ट टू गव्हर्न्मेंट या हुद्याचें डेप्युटी डायरेक्टर ऑफ् ॲग्रिकल्चर, क्रॉप रीसर्च या हुद्यांत रूपांतर करण्यांत आलें आहे.

शेतकी खात्यातर्फे चालविण्यांत येणारे शास्त्रीय शोध लावण्याचें काम झपाट्यानें वाढत आहे व इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रीसर्च इंडियन कॉटन कमिटी व सर ससून डेव्हिड ट्रस्ट फंड यांसारख्या संस्थांच्या उदार मदतीनें व सहकार्यानें तें बरेंच सोपें झालें आहे. त्यांच्या स्थापनेपासून या संस्थांनीं प्रांतांतील शेतीसंबंधीं शोध व सुधारणा करण्याच्या कार्यासाठीं अनुक्रमें सुमारें रु. १६ लाख, रु. २१ लाख व रु. ५ लाखपर्यंत रकमांची मदत दिलेली आहे.

रिपोर्टाच्या वर्षी शेतकी खात्याचा खर्च १७,५३,१७५ रुपये झाला तर तोच मागील सालीं रु. ९,५४,९२९ इतका झाला होता. खात्याचें उत्पन्न २,१२,९६८ रुपये होतें तर तेंच मागील सालीं रु. २,००,४४२ इतकें होतें. सन १९४२ सालच्या खरीफ हंगामासाठीं "अधिक धान्य पिकवा" ह्या चळवळीच्या संबंधांत बियाणें खरेदी करण्यासाठी व तें वांटून देण्यासाठीं आर्थिक मदत करण्याकरितां डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर यांच्या ताब्यांत रु. १,७०,००० जादा पर्सनल लेजर अकाउंट देण्यांत आला होता.

### आर. ए. परीक्षेचे निकाल

हिंदुस्थान सरकारच्या ऑडिटर्स सर्टिफिकेट रूलसअन्वयें दरसाल आर. ए. (रजिस्टर्ड अकौंटंट) च्या परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षा पहिली व शेवटली अशा दोन असून त्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली व लाहोर या ठिकाणीं एप्रिल महिन्यांत घेतल्या जातात. यंदा झालेल्या परीक्षांचा निकाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. पहिल्या परीक्षेला एकूण सुमारें ४६० उमेदवार बसले होते त्यांपैकीं ९७ उत्तीर्ण झाले. यशस्वी उमेदवारांत खालील महाराष्ट्रीय उमेदवारांचीं नांवें आढळतात:—

बोरकर एम. डी., देशपांडे सी. व्ही., ढवण जे., गोरे व्ही. एच., कुलकर्णी जी. व्ही., ओक एस. पी., पद्ये डी. के., पालकर जी. एच., फडके एस. आर., सरनाईक पी. पी., सोहनी एस. के., ताम्हणे के. व्ही.

पहिली परीक्षा झाल्यानंतर यशस्वी उमेदवारांना सरकारमान्य (approved) अकौंटंटकडे विवक्षित मुदतीपर्यंत आर्टिकल्स भरून कामाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा लागतो. नंतर शेवटची परीक्षा होते; तींत उत्तीर्ण होणारांस रजिस्टर्ड अकौंटंट म्हणून नोंदण्यांत येतें।

# स्फुट विचार

### मि. चर्चिल ह्यांनीं केलेलें सिंहावलोकन

युद्धाचें लोण प्रत्यक्ष आपल्याच देशांत येऊन पोहोंचलें असतां, जर्मन सैन्यें स्वतःचे प्राण पणास लावून लढल्यावांचून रहाणार नाहींत हें अपेक्षित होतें. अटलांटिक महासागराचा किनारा व फ्रान्स देश बराच काळ आपण लढत ठेवूं शकूं अशी त्यांची पहिली कल्पना होती, पण त्यांस दक्षिणच्या बाजूनेंहि शह बसल्यामुळें जर्मन सेनानींस स्वदेशाच्या दिशेनें मागें हटावें लागलें. संबंध फ्रान्स त्यांच्या हातचा जाऊन बेल्जममधून त्यांस पाय मागें घेणें प्राप्त झालें, एवढेंच नव्हे तर सिगफ्रीडच्या तटबंदीच्या आश्रयानें मित्रराष्ट्रांच्या जर्मनीवरील हल्ल्याचा प्रतिकार करण्याची पाळी आली. ह्या तटबंदीच्या उत्तरेकडील टोकाच्या बाजूनें हॉलंडमधून ब्रिटिश फौजा जर्मनींत घुसूं लागल्या तेव्हां तेथें जर्मन सैन्यानें त्यांस निकराचा विरोध केला. पश्चिम आघाडीवरील लढाया हें जर्मनीवरचें प्राणसंकट आहे आणि तें दूर ढकलण्याचा शत्रूनें कितीहि प्रयत्न केला तरी तें आतां कांहीं टळत नाहीं. ह्या परिस्थितीच्या दृष्टीनें मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत सिंहावलोकनात्मक भाषण करतांना युरोपांतलें युद्ध चालू वर्षाचे अखेर संपावें असें आहे तरी तें पुढील सालच्या प्रारंभाच्या महिन्यांतहि रेंगाळत रहाण्याचा संभव आहे असें सावधगिरीच्या वृत्तीनें सांगितलें, तें योग्यच आहे. जर्मनीचा सर्व बाजूंनीं असा कोंडमारा होत आहे कीं त्यास फार वेळ तग धरून रहाणें शक्य नाहीं हें स्पष्ट आहे. मि. रूझव्हेल्ट ह्यांच्याशीं नुकत्याच झालेल्या चर्चेत मि. चर्चिल ह्यांनीं ज्या अनेक महत्त्वाच्या बाबींविषयीं वाटाघाटी केल्या त्यांमध्यें जपानविरुद्ध व्हावयाच्या चढाईची सिद्धता, जर्मनीचा पराभव होतांच त्या देशांत करावयाची व्यवस्था, पोलंड व पूर्व युरोपांतील बाल्कनसमधल्या सारखे देश ह्यांचें भवितव्य, इत्यादि प्रश्न प्रमुख असले पाहिजेत. जपानच्या पाडावाच्या युद्धांत इंग्लंड अमेरिकेच्या बरोबरीनें आपली सर्व शक्ति खर्ची घालीन असें आश्वासन मि. चर्चिल ह्यांनीं दिलें आहे. ह्या बाबतींत आणि युरोपच्या पुनर्रचनेच्या संबंधांत इंग्लंड, अमेरिका व रशिया ह्यांचें पूर्ण सहकार्य व ऐकमत्य होणें अगत्याचें आहे आणि त्याकरितां मि. चर्चिल, मि. रूझव्हेल्ट व मि. स्टालिन ह्यांनीं एकत्र येऊन चर्चा करणें आवश्यक आहे. अशा वाटाघाटी लवकरच होतील असें मि. चर्चिल ह्यांनीं म्हटलें आहे. युद्धकाळाइतकाच युद्धानंतरचा काळ अडचणींचा आहे. त्यांत मतभेदांस पुष्कळ जागा आहे. तथापि ह्या प्रकारच्या अडचणी दूर सारून पुढील धोरणाचा निर्णय, ब्रिटिश, अमेरिकन व रशियन मुत्सद्यांनीं करावयास पाहिजे. ह्या संबंधांत त्यांचेवर प्रचंड जबाबदारी येऊन पडली आहे आणि तिची जाणीव त्यांस आहे ह्यांत शंका नाहीं.

---

### रबराच्या धंद्यास हिंदुस्थानांत वाव

बनारस विश्वविद्यालयांतील डॉ. एस. एन. घोडवोले ह्यांनीं गेल्या आठवड्यांत मुंबई विश्वविद्यालयाच्या केमिकल टेक्नॉलाजी खात्यामध्यें "हिंदुस्थानांतील रबराचा धंदा" ह्या विषयावर भाषण केलें. आपल्या भाषणांत त्यांनीं रबराच्या धंद्याचें सिंहावलोकन केलें. १९४० सालीं रबराचें जागतिक उत्पादन १३ लक्ष ९० हजार टन झालें. १९४३ सालीं हिंदुस्थानांत २० हजार टन रबर निघालें. १७७० मध्यें रबराची किंमत प्रत्येक पौंडास ५ पौंड होती १९०८ सालीं ती २ पौंड ८ शिलिंगावर आली. १९३२ मध्यें रबर ३½ आणे पौंड मिळूं लागलें. आतांचा नियंत्रित भाव १⅞ रु. पौंड आहे. १९४३–४४ मध्यें अमेरिकेनें ५० हजार टन, रशियानें ९० हजार टन, कॅनडानें ४० हजार टन व जर्मनीनें ७० हजार टन कृत्रिम रबर तयार केलें. १९४५ सालीं १० लक्ष टन कृत्रिम रबर निर्माण करण्याचा अमेरिकेचा बेत आहे. युद्धसमाप्तीनंतर, रबराचे मळेवाले आपले मळे बंद करून भांडवल दुसरीकडे गुंतवितील असें वाटत नाहीं; कृत्रिम रबराचे कारखाने तयार होणार नाहींत व कांहीं बाबतींत कृत्रिम रबर स्वाभाविक रबरापेक्षा सरस असल्यानें त्या रबराचेंहि उत्पादन चालू राहील, असें त्यांनीं सांगितलें. हिंदुस्थानांत रबराचा धंदा सुरू करणें शक्य आहे व त्यासाठीं हिंदी विश्वविद्यालयांनीं त्यासंबंधांत शिक्षणक्रम योजावा, अशी त्यांनीं सूचना केली.

---

### दर एकरी उसाचें व साखरेचें उत्पादन वाढविण्याची आवश्यकता

मि. लालचंद हिराचंद ह्यांनीं आपल्या एका ताज्या भाषणांत हिंदी साखरेच्या धंद्याविषयीं व्यक्त केलेले विचार महत्त्वाचे आहेत. साखरेच्या उत्पादन खर्चापैकीं निम्मा खर्च उसाच्या किंमतीचा असतो, हें लक्षांत घेतां उसाचें उत्पादन अधिक कार्यक्षम करण्याचें महत्त्व तात्काळ लक्षांत येतें, हें सांगून आज हिंदी कारखान्यांना उत्पादन खर्च कमी करण्याचें महत्त्व वाटत नसलें, तरी जावामध्यें साखरेचें उत्पादन पुनः सुरू झालें, कीं त्याची झळ हिंदी गिरण्यांस लागल्याविना रहाणार नाहीं व साखरेची निर्गत चालू ठेवणें कठीण जाईल, असा त्यांनीं इशारा दिला. हिंदुस्थानांतील दर एकरी उसाचें सरासरी उत्पादन कमी होत चाललें आहे, ही गोष्ट खालील आकडे दर्शवितात—

| वर्ष | दर एकरीं उसाचें उत्पादन ( मण ) |
|---|---|
| १९३५–३६ | ४०५ |
| १९३७–३८ | ३८४ |
| १९३९–४० | ३४५ |
| १९३५–३६ ते १९३९–४० ( सरासरी ) | ३६७ |

जावा व हवाई येथें उसाचें उत्पादन हिंदी उत्पादनाच्या दुपटीपेक्षां जास्त आहे आणि तेथील उसांत साखरेचा अंशहि अधिक आढळतो, असें श्री. लालचंद ह्यांनीं सांगितलें. सेंट्रल शुगरकेन कमिटीचें काम लवकरच सुरू होऊन ती ह्या प्रश्नाकडे लक्ष पुरवील व हिंदी ऊंस अधिक फलदायी करण्यास सहाय करील अशी अपेक्षा आहे.

---

### इनकमटॅक्स अधिकाऱ्यांची भरती

इनकमटॅक्स अधिकाऱ्यांचें कार्य व त्यांची जबाबदारी ह्यांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं हिंदुस्थान सरकार भरतीच्या पद्धतींत सुधारणा करणार आहे. परीक्षेंत वर येणाऱ्या उमेदवारांस वरिष्ठ जागा देण्यांत यावयाच्या आहेत.

### लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

अहवालाचे मुदतींत शेअर भांडवल १,६७० रुपयांनीं वाढून तें २४,१५० रुपये झालें. सभासदांची संख्या ६९९ झाली आहे. ठेवींचा आकडा १ लक्ष, २८ हजार रु. असून येणें कर्ज ७१½ हजार रुपये आहे. थकबाकीचें प्रमाण ११·५% आहे, म्हणजे तें जास्ती जात चाललेलें आहे. निव्वळ नफा १,७७१ रुपये झाला व ३½% दरानें डिव्हिडंड वाटण्याचें ठरलें. बँक अहवालाचे वर्षी प्रथमच 'अ' वर्गात आली. त्यापूर्वी तीन वर्षे ती 'ब' वर्गात होती. . . .

### अमळनेर को. अर्बन बँक लि.,

ह्या बँकेचें वसूल भांडवल ५४,८५० रुपये असून रिझर्व्ह फंड ७७ हजारांचा आहे आणि इतर फंडांत ७३½ हजार रुपये आहेत. एकूण ठेवी ४ लक्ष, ८१ हजार रुपयांच्या आहेत. येणें कर्ज २ लक्ष, २२½ हजार रुपये आहे. गत वर्षापेक्षा ही रकम ९१ हजारांनीं जास्त आहे. थकबाकीचे रकमेंत ३,७७७ रुपयांची घट दिसत आहे. वर्षअखेर निव्वळ नफा १५,८७४ रुपये झाला. भागीदारांस ७½ डिव्हिडंड मिळालें.

### सोलापूर डि. सें. कों. बँक लि.

(वार्षिक सभा: ८–१०–१९४४)

वरील बँकेचा रौप्यमहोत्सव ता. १८–९–१९४३ रोजीं साजरा करण्यांत आला. ३०–६–४४ अखेर बँकेचें भाग भांडवल १,३१,००० रुपयांचें असून तिचेकडे ठेवी २७¾ लक्ष रुपयांच्या आहेत. पतपेढ्यांकडील कर्जामध्यें, घरांचे तारणावरील कर्जामध्यें व मालतारणावरील कर्जामध्यें अहवालाचे सालीं घट दिसून येत आहे. मोहोळ येथें सेल शॉप स्थापन करण्यांत आलें आहे, त्याला धान्य वाटपाचें काम देण्यांत आलें आहे. पंढरपूर येथें रेशन शॉप व करमाळा येथें फेअर प्राइस शॉप सुरू केलीं आहेत. बँकेस २२,३०२ रुपये नफा झाला. डिव्हिडंड ५% मिळेल.

### श्रीमहावीर को. बँक लि., कोल्हापूर

साल अखेर सभासदांची संख्या ६१५ होऊन शेअर भांडवलाची रकम ४५,९४० रुपये झाली. बँकेकडील ठेवींच्या रकमेंत थोडी घट झाली. बँकेकडील ठेव रकमेशीं रोख व बँकांत शिल्लक असलेल्या रकमेचें प्रमाण व सोनें-चांदी तारणावरील कर्ज यांमध्यें अधिक रकम गुंतवून तरत्या भांडवलाची व्यवस्था ठेवून त्यावर शक्य तों अधिक व्याज मिळविणेविषयीं दक्षता घेतलेली दिसून येईल. बँकेस ९,७६९ रुपये नफा झाला. डिव्हिडंडचा ७½% दर पांच वर्षे कायम आहे.

### दि को. पीपल्स बँक लि. लिंब

ह्या बँकेच्या सभासदांत ७ सभासदांची भर पडून त्यांची संख्या ६३ झाली व भाग भांडवल ४,०२५ रुपये झालें. बँकेचा व्यवहार वाढला आहे, ठेवींत वाढ झाली आहे व हुंडी खातें किफायतशीर होत आहे. बँकेनें सुमारें ४० खंडी पेंड आणवून ती लोकांना सवलतीचे दरानें दिली. साखऱ्या मिळवून तो स्थानिक लोकांस दिला. सभासदांकडून अॅडव्हान्स घेऊन बराच माल खरेदी करून आणवून दिला. अहवालाचे वर्षी बँकेस ७२३ रुपये नफा झाला. लिंबसारख्या अडवळणी व व्यापारांत मागासलेल्या गांवीं बँक उत्कृष्ट कामगिरी चिकाटीनें करीत आहे व तिची सालोसाल प्रगति होत आहे.


पूना गेस्ट हाऊस



टेलिफोन नं. ७७९

संस्थापक :
कै. नानासाहेब सरपोतदार

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाऊस
बुधवार चौक, पुणें २.

गांवोगांवीं विक्रेते पाहिजेत.

A 9

क्विनीनचे ऐवजीं मलेरियाकरतां खात्रीचा अनुभविक उपाय म्हणून 'एनाईन' वापरतात.

अलपाईन प्रॉडक्टस् (इंडिया) पुणें २

जिकडे तिकडे प्रशंसा

इमिटेशन दागिन्यांवर रासायनिक क्रिया करून खऱ्या सोन्याचा पत्रा चढविला जातो त्यामुळें दागिना केव्हांही खराब होत नाहीं, ही पूर्ण खात्री झाली. सोन्याचा पत्रा चढविलेल्या चार बांगड्या किं. आठ रु. गरजेस्तव दागिना परत करणें झाल्यास वर चढविलेल्या सोन्याचे सर्वच्या सर्व पैसे परत देऊं.

भट कं. सांगली, S. M. C.
भट कंपनी शाखा–बुधवार पेठ, पुणें २.

# चितळेवाडी येथील धान्य व चारादिन

## • सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मे. कोरीन व मुंबई इलाख्यांतील प्रख्यात सरकारी व बिनसरकारी शेती-तज्ज्ञांची चितळेवाडीस भेट

### आद्य धान्य व चारा-उत्पादनाच्या विस्तृत, शास्त्रोक्त व मार्गदर्शक उपक्रमाबद्दल सर्वांकडून चितळे बंधूंचें अभिनंदन

ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि. ( गूळ कंपनी ) या कंपनीच्या चितळेवाडी येथील इस्टेटवर ता. २८ ऑगस्ट रोजीं " धान्य व चारादिन " ( Food-fodder day ) साजरा करण्यांत आला. या प्रसंगीं सोलापूर जिल्ह्याचे कलेक्टर मे. जे. एम. कोरीन हे सन्माननीय पाहुणे होते. मुंबई सरकारचे डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ( हेडक्वार्टर्स ) रावबहादूर सालीमठ हे सदर समारंभासाठीं खास हजर राहिले होते. त्याचप्रमाणें मुंबई सरकारचे रिटायर्ड सॉईल फिजिसिस्ट श्री. एन्.व्ही. कानिटकर, मुंबई सरकारचे रिटायर्ड केमिस्ट, रावबहादूर काकासाहेब सहस्रबुद्धे, श्रीयुत के. व्ही. जोशी, रिटायर्ड डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ही शेतकी विषयांतील बडी बडी तज्ज्ञ मंडळी हजर होती. रावबहादूर गणेश विनायक पटवर्धन, रिटायर्ड स्मॉलकॉज जज्ज, पुणें, श्रीयुत जी. एल. ढेकणे, रिटायर्ड सबजज्ज, पुणें, श्रीयुत आठवले एस. डी. ओ. माळशिरस, फोंडशिरसचे बागाईतदार श्रीयुत दाते व सोलापूर जिल्ह्यांतील इतर बागाईतदार व शेतकरी लोक वगैरे बरीच मंडळी हजर होती. कंपनीचे चेअरमन डॉ. दादासाहेब भडकमकर व डेक्कन पेपर मिलचे मॅनेजिंग एजंटसपैकीं श्रीयुत एस. के. भावे व श्रीयुत भाऊसाहेब मोडक ही मंडळीहि समारंभासाठीं खास हजर होती.

कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्रीयुत तात्यासाहेब चितळे यांनीं डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर रावबहादूर सालीमठ यांच्या समवेत मे. कलेक्टरसाहेबांचे कंपनीचे इस्टेटवर स्वागत करून त्यांना कंपनीनें केलेली ज्वारी, साळ वगैरेचीं हिरवींगार व भरघोस पिकें व जमीन सुधारणा व बांध-बंदिस्ती दाखवीत दाखवीत सभास्थानीं आणिलें. कंपनीचे चेअरमन डॉक्टर दादासाहेब भडकमकर व मॅनेजिंग एजंट श्री. दादासाहेब चितळे यांनीं सर्व सन्माननीय पाहुण्यांसमवेत मे. कलेक्टरसाहेबांचे स्वागत केल्यानंतर सभेस सुरुवात झाली. कंपनीनें केलेल्या पिकांचे कांहीं नमुने सभास्थानीं ठेवण्यांत आले होते. चितळे-बंधूंनीं धान्य-उत्पादनाचे बाबतींतहि अल्पावधींत किती बहुमोल यश मिळविलें याचें हें सर्व नमुने जणू प्रात्यक्षिकच होतें.

कंपनीचे चेअरमन डॉ. दादासाहेब भडकमकर यांनीं मे. कलेक्टरसाहेब यांचे आभार मानून कंपनीनें हातीं घेतलेल्या एक हजार एकरावरचे विस्तृत व जास्तींत जास्त धान्य उत्पादन करण्याच्या श्रीयुत चितळे बंधूंच्या योजनेचे आजचे अडचणीचे दिवसांत केवढें महत्त्व आहे व ही योजना किती उपयुक्त व अभिनंदनीय आहे हें विशद करून सांगितलें. ते पुढें म्हणाले, "कंपनीनें गेल्या २–३ वर्षांचे अवधींत उसापासून गूळ तयार करून तो धंदा ज्याप्रमाणें यशस्वी करून दाखविला त्याचप्रमाणें पेंड वगैरे खतें घालून, आद्य व पद्धतशीर मशागत करून शास्त्रोक्त रीतीनें धान्य-उत्पादन केल्यास धान्याची शेतीसुद्धां किफायतशीरपणें व दोन पैसे मागें टाकून करितां येण्यासारखी आहे हें चितळे-बंधू लवकरच सप्रयोग सिद्ध करून दाखवितील. धान्य पिकविण्याची जरूरी लढाईपुरतीच नसून ती कायमचीच आहे व त्या दृष्टीनें आपल्याला शेती नेहमींच किफायतशीरपणें करितां येईल याचेंच उदाहरण चितळे बंधू आपणा शेतकरी वर्गास घालून देत आहेत. या योजनेंत सरकारी साहाय्यानें त्यांना पूर्ण यश येवो."

त्यानंतर मे. कलेक्टरसाहेब यांनीं मराठींत भाषण करून कंपनीचीं धान्याचीं उभीं भरगच्च पिकें पाहून त्यांना फारच समाधान वाटल्याचें त्यांनीं सांगितलें. ते पुढें म्हणाले, "दाण्याचे इतकें चांगलें पीक मीं बघितलें नव्हतें. सरकारला व आपल्याला धान्याची व्यवस्था केली पाहिजे. सर्व शेतकरी जोंपर्यंत भरपूर धान्य पिकविणार नाहींत तोंपर्यंत धान्याचा भरपूर पुरवठा होणार नाहीं. सर्व शेतकरी चितळे यांचेंप्रमाणेंच धान्य पिकवितील तर धान्याचा सांठा वाढून सरकारची धान्याची काळजी दूर होईल. चितळे यांचें धान्याचें पीक सर्व शेतकरी वर्गानें जरूर पाहण्यासारखें आहे. चितळे यांनीं इतकें चांगलें धान्याचें पीक केलेलें पाहून फारच समाधान वाटलें. याबद्दल मी त्यांचें पुनः पुनः अभिनंदन करितों."

कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्रीयुत तात्यासाहेब चितळे यांनीं 'धान्य व चारा दिना'चें औचित्य व महत्त्व समजावून सांगितलें. ते पुढें म्हणाले, " धान्याची टंचाई लक्षांत घेऊन उसावरील लक्ष कमी करून आम्हीं यंदा मुद्दाम धान्याचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर हातीं घेतलें आहे. तें करीत असतांना आम्हांला असा अनुभव आला कीं, अन्नधान्याचें उत्पादन किफायतशीरपणें करावयाचें असेल तर जमिनीची मशागत चांगली झाली पाहिजे. पूर्वापार पद्धतीनें धान्य पिकविण्यांत अर्थ नाहीं. कंपनीनें यंदा धान्याच्या उत्पादनासाठी १०००–१२०० च्या वर एकर जमिनीची उत्तम प्रकारें मशागत केली असून त्यासाठी आम्ही पुष्कळ पैसा खर्च केला आहे. जमिनींत उताराला आडवे ३३ फुटांवर मोठाले बांध व ११ फुटांवर लहान बांध घातले आहेत. आमचीं बहुतेक सर्व पिकें पाटाचे पाण्यावरच केलीं जातात. रात्रींहि पिकांना अंधेरांत पाटाचें पाणी द्यावें लागतें. अशावेळीं दिलेलें पाटाचें पाणी सर्व जमिनीस सारखें पोहोंचावें या दृष्टीनें बांध व त्यांची रचना करणें जरूर असते व तशीच बांधवरंब्यांची रचना आम्हीं केली आहे. या कामीं आम्हांस एकरीं बराच खर्च आला आहे. हा सर्व खर्च एकाच वर्षाच्या पिकांतून भरून निघावयाचा नाहीं, पण ३–४ वर्षांच्या पिकांत हा खर्च खात्रीनें भरून निघूं शकेल. जमीन हेंच शेतीच्या उत्पादनाचें प्रमुख साधन असल्यामुळें जमीन सुधारण्याकरितां ( Land Development ) जो खर्च करावा लागेल तो करणें आवश्यक आहे व हा खर्च भांडवल-खर्च म्हणून समजला पाहिजे. आम्हीं या दृष्टीनें हजारबाराशें एकरांच्या वर धान्याच्या पिकांचा प्रयोग करीत आहोंत. २–३ वर्षांत हा प्रयोग यशस्वी करून दाखवून धान्याची शेती किफायतशीर होऊं शकते हें सिद्ध करून दाखवूं अशी आम्हांस पूर्ण उमेद आहे."

रावबहादूर सालीमठ, डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर हेडक्वार्टर्स, पुणें, हे आपल्या भाषणांत म्हणाले, "कंपनीचीं पिकें पाहून फारच समाधान वाटतें. इकडच्या भागांत सरसकट बाजरी चांगली होत नाहीं म्हणून त्याच्याऐवजीं खरीप ज्वारीच चांगली होते म्हणून बाजरी न करतां खरीप ज्वारीच करावी अशी माझी सूचना आहे. पाटांचे पाण्यावर भाताचें पीकहि चांगलें येतें. पाटाच्या व विहिरीच्या पाण्यावर हुंडी पेरतात पण त्यापासून फक्त चारा निघतो, धान्य निघत नाहीं म्हणून त्याचेऐवजीं खरीप ज्वारी केल्यास चाराहि मिळेल व धान्यही निघेल. ज्वारीचें धान्य एकरीं १२००० पौंड असावें व एकरी चारा ३५ हजार पौंड निघावा म्हणजे पीक फार चांगलें. उसाइतकेंच लक्ष ज्वारी व भाळ यांना दिलें पाहिजे. अशा तऱ्हेनें लक्ष घालून चितळे बंधूंनीं शेतकऱ्यांना मार्गदर्शक अशी शेती करून दाखविली याबद्दल मी त्यांचें अभिनंदन करतों."

यानंतर पुण्याचे रावबहादूर काकासाहेब सहस्रबुद्धे म्हणाले, 'चितळे बंधूंनीं या भागांत शेतीची सुधारणा करून चांगला मार्ग दाखविला आहे. जमीन निकस असून सुद्धां शेती कशी फायदेशीर करितां येतें हें येथें बघतां येईल. मे. कलेक्टरसाहेब म्हणतात त्याप्रमाणें चितळे बंधूंनी सरकार व लोक यांची धान्याची या भागांतील बरीचशी काळजी पुढारीपणा घेऊन दूर केली आहे. त्यांनीं सर्वच प्रकारची शेती व बागाइत केली आहे व ते सर्वच उत्तम प्रकारचे आहे. त्यांनीं शेतकऱ्यांना दिलेल्या मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचे आभार मानतों व अभिनंदन करतों.

श्री. के. व्ही. जोशी, रिटायर्ड डेप्युटी डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर, हे आपल्या भाषणांत म्हणाले, "शेतकरी बंधूनो, मी शेतकी खात्यांत ३० वर्षें काम करून रिटायर्ड झालों आहें व शेतींत बराचसा अनुभव घेतला आहे. सरकारच्या डेमॉन्स्ट्रेशन फार्ममध्यें चांगलें पीक करून दाखविलें जातें पण त्याविषयीं लोकांचा प्रवाद असा असतो कीं, सरकारजवळ भरपूर पैसा आहे म्हणून ते वाटेल तसा खर्च करून चांगलीं पिकें करून दाखवितां येतात. सरकारी डेमॉन्स्ट्रेशन फार्मचें सोडून दिलें तरी ह्या कंपनीनें उत्कृष्ट पिकें करून दाखविलीं आहेत. यांचे तर पैसे वर आलेले नाहींत. कंपनी धंद्याकरितांच काढलेली आहे. तेव्हां ते फायद्याकरितांच शेती करतात म्हणून त्यांची शेती पाहून तरी असा आक्षेप कोणी घेऊं शकणार नाहीं. शेतकऱ्यांच्या फायद्याची सुधारणा त्यांना येथें बघावयास मिळेल. चितळे बंधूंचा उपक्रम सर्वांना मार्गदर्शक व्हावा. त्यांच्या उपक्रमाबद्दल मी त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों."

श्री. एन. व्ही. कानिटकर, रिटायर्ड सॉईल फिजिसिस्ट आपल्या भाषणांत म्हणाले, "ह्या अन्नटंचाईच्या काळांत चितळे बंधु यांनीं मोठ्या प्रमाणावर उत्तम शेती करून फार मोठें कार्य केलें आहे व त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. मी दहा वर्षें सोलापूर येथें कोरडवाहू शेतीवर प्रयोग केले. पाटाच्या पाण्याशिवाय पावसावर शेती कशी यशस्वी करावी याबद्दल कांहीं प्रयोग होऊन मुंबई इलाख्यांत दुर्जल शेती यशस्वी करण्यासाठीं प्रयत्न झाले आहेत. तसे प्रयोग चितळे बंधूंनीं येथेंहि करून दाखवावेत व मुद्दाम दरसाल निदान दहा बारा एकर जमीन कोरडवाहू शेतीसाठी राखून ठेवून त्यांतहि यशस्वी पीक करून दाखवावें अशी माझी त्यांना नम्र सूचना आहे. यायोगें कोरडवाहू जमिनीच्या शेतकऱ्यालाहि चांगलें मार्गदर्शन होईल."

त्यानंतर या भागांतील बागायतदार श्री. आण्णासाहेब हाते यांनीं आपले कांहीं अनुभव सांगून भाषण केलें. ते म्हणाले, "धान्य आपल्याकडे विशेषतः या भागांत फार कमी पिकतें म्हणून आपल्याला व सरकारलाहि काळजी उत्पन्न झाली आहे. पण चितळेबंधूंच्या उपक्रमानें आम्हां बागायतदारांना आतां आत्मविश्वास वाटू लागला आहे. या भागांत सुद्धां खाण्यापुरतें धान्य खात्रीनें किफायतशीरपणें उत्पन्न करतां येईल. चितळेबंधूंच्या उदाहरणावरून व त्यांचीं धान्याचीं शेतें बघूनहि आम्हीं बागायतदार व शेतकरी लोक अद्याप किफायतशीर धान्य-शेतींतील मर्म समजून घेऊं शकलों नाहींत तर दुर्दैव! या कंपनीच्या शेतांत धान्याचें जितकें पीक आलें आहे तितकें पीक मी २०–३० वर्षांत कोठें पाहिलें नव्हतें. चितळेबंधूंच्या पावलावर पाऊल ठेवून जर आम्हीं धान्य पिकवूं लागलों तर आमच्या प्रांतांतील धान्याची टंचाई आपोआप कमी होईल. जास्त धान्य आपण पिकवूं लागलों म्हणजे सरकारालाहि आपल्याला जास्त धान्य वाटून देतां येईल व सरकारची व आपली काळजी मिटेल."

समारोपादाखल भाषण करतांना कंपनीचे मॅनेजिंग एजंट श्रीयुत दादासाहेब चितळे म्हणाले कीं, आजच्या समारंभाचें सन्माननीय पाहुणे मे. कलेक्टर साहेब व त्याचप्रमाणें इतर सर्व उपस्थित झालेली बडी मंडळी या सर्वांनीं जातीनें हजर राहून आजचा समारंभ साजरा करण्यास आम्हांस हातभार लावला याबद्दल या सर्वांचें मी कंपनीच्या वतीनें कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. श्रीयुत कानिटकरसाहेब यांनीं सुचविल्याप्रमाणें कोरडवाहू शेतीचा प्रयोग आम्हीं पुढील सालीं जरूर हातीं घेऊं. धान्याचें उत्पादन इतर देशांत आपल्यापेक्षां एकरी दुप्पट व तिप्पट जास्त निघूं शकतें. अशाच तऱ्हेचें उत्पादन आपण करूं शकल्यास आपल्याकडीलहि शेती खात्रीनें किफायतशीर होईल व धान्याचा प्रश्न सुटेल.

सभा बरखास्त होण्याच्या सुमारास मे. कलेक्टरसाहेब सभास्थानीं उठून श्रोतृवर्गास पुन्हां म्हणाले, "चितळे यांनीं केलेलीं पिकें तुम्हीं प्रत्यक्ष पहा व त्याचप्रमाणें तुम्हीं धान्य करा." इतकें झाल्यावर सभेचें काम संपलें.

---

### महाड को. अर्बन बँक लि.

बँकेचें अधिकृत भांडवल (२५००० रु.) पुरें झाल्यामुळें मागील सालीं तें ३०,०१० रु. करण्यांत आलें, परंतु नवीन सर्व शेअर्स खपून मागणी पुरी करितां आली नाहीं. आणखी १० हजारांनीं भांडवल वाढविण्यांत येणार आहे. ठेवींत भर पडली असून व्यवहारहि थोडा वाढला आहे. महाड येथें दुसरी एक बँक उघडण्यांत आली आहे. बँकेच्या ४ लक्ष ५४ हजार रुपयांच्या खेळत्या भांडवलापैकी १ लक्ष ६० हजार रु. रोख व बँकांत शिल्लक आहेत आणि २ लक्ष ७९ हजारांचे सरकारी रोखे आहेत. कर्जें ८,३५० रुपयांचीं असून कॅश क्रेडिट खातीं २,८४० रुपये आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस ५,९०८ रुपये नफा झाला व ६% दरानें डिव्हिडंड वाटण्यांत आलें.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व
रा. धोंडो वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।११, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.